# भारत - बांग्लादेश परराष्ट्र संबंध

**कु.जुई विजय पतंगे. संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**सारांश :**

बांग्लादेश निर्मितीमध्ये भारताचा मोलाचा वाटा आहे. स्वातंत्र्य पूर्वकाळापासून भारत आणि बांग्लादेश मध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय संबंध प्रस्थापित आहेत. भारत-बांग्लादेश परराष्ट्र संबंधांमध्ये बांग्लादेश मधील राजकीय परिस्थितीनुसार चढ-उतार आलेले दिसून येतात. शेख मुजीब उर रहमान व शेख हसीना यांच्या काळात भारत बांग्लादेश संबंध सौहार्दाचे असलेले दिसून दिसतात. बांग्लादेश मधील चीनचा वाढता हस्तक्षेप भारतासाठी धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे बांग्लादेश मधील घडामोडींवर भारताचे नियंत्रण असणे गरजेचे ठरते. भारत-बांग्लादेश संबंध सातत्याने सलोख्याचे व परस्परपूरक राहण्यासाठी उच्चस्तरीय मुत्सद्दी प्रयत्नशील आहेत.

बीज संज्ञा : शेख मुजीब उर रहमान, सामारीक सहकार्य, शरणार्थी, शेख हसीना, 1971 चे युद्ध, राजकीय सलोखा

**प्रस्तावना :**

भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ, श्रीलंका, भूतान, अफगाणिस्तान व मालदीव यांना प्रामुख्याने दक्षिण आशियाई देश म्हणून ओळखले जाते. जगाच्या सुमारे २५% लोकसंख्या या भागात एकवटलेली आहे. हिंदु, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौध्द, जैन, पारशी या विविध धर्मांचे लोक या प्रदेशात वास्तव्यास आहेत. भौगोलिक संलग्नतेमुळे दक्षिण आशियाचा बहुतांश प्रदेश हा भारतीय उपखंड म्हणून ओळखला जातो. यापैकीच एक महत्त्वाचा देश म्हणजे बांग्लादेश होय. बांग्लादेश भारताचा प्रमुख शेजारी देश आहे. बांग्लादेश तिन्ही बाजूंनी भारताने वेढलेला आहे. भारत व बांग्लादेश दरम्यान जवळजवळ ४०९६ किलोमीटर लांबीची भूसीमा आहे. जी जगातली पाचवी सर्वात लांब भूसीमा आहे. भारताच्या आसाम, त्रिपुरा, मिझोराम, मेघालय आणि पश्चिम बंगाल या राज्यांची सीमा बांग्लादेशला लागून आहे. बांग्लादेशची दक्षिणेकडील बाजू बंगालच्या उपसागराने वेढलेली असल्याने भारत बांग्लादेश दरम्यान सागरी सीमाही सामाईक आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

१४ ऑगस्ट १९४७ रोजी मुस्लीम बहुसंख्याक भागाचे पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आले. परंतु त्याचे पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान असे दोन भाग होते. भौगोलिकदृष्ट्या भारताच्या पूर्वेकडील पश्चिम बंगाल व आसाम लगतचा प्रदेश पूर्व पाकिस्तान तर भारताच्या पश्चिम सीमेस लागून असलेला प्रदेश पश्चिम पाकिस्तान म्हणून ओळखला जात असे. एकाच देशाचे दोन भाग असलेल्या या मुस्लिम बहुसंख्य प्रदेशात भाषा, आहार, राहणीमान, पोशाख पद्धती, शिक्षण यात कमालीची भिन्नता होती. पश्चिम पाकिस्तानातील बहुसंख्य लोक उर्दू भाषेचा वापर करीत तर पूर्व पाकिस्तानातील बहुसंख्य लोक बंगाली भाषा बोलत असत. पूर्व पाकिस्तानातील लोकांच्या आहारात प्रामुख्याने भात व मासे यांचा समावेश असे तर पश्चिम पाकिस्तानच्या लोकांच्या आहारात इतर मांसाहारी पदार्थांचा समावेश असे. पूर्व पाकिस्तानातील लोक पश्चिम पाकिस्तानातील लोकांच्या तुलनेत अधिक शिकलेले होते. त्यामुळे त्यांचे राहणीमान पश्चिम पाकिस्तानातील लोकांपेक्षा उच्च दर्जाचे व आधुनिक होते. 1970 च्या पाकिस्तानी निवडणुकात शेख मुजीब उर रहमान यांच्या बंगाल अवामी लीग या पक्षाने बहुमत मिळवले मात्र पश्चिम पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानचे राजकीय वर्चस्व मानण्यास नकार दिला. पश्चिम पाकिस्तान मधील नेत्यांनी मुजीब उर रहमान यांना मार्च 1971 मध्ये कैद केले. पश्चिम पाकिस्तान ने पूर्व पाकिस्तान मध्ये आपले लष्करी सैन्य घुसवले. या लष्करी सैन्याने पूर्व पाकिस्तानी जनतेवर अनन्वित अत्याचार केले. पाकिस्तानी सैन्याचे अलबद्र, अल्सम्स आणि रझाकार असे तीन भाग करण्यात आले होते. त्यामधील रझाकार ही संघटना स्त्रियांवर अत्याचार करण्यासाठी खूप कुप्रसिद्ध होती. या काळात सुमारे 30 लाख लोकांच्या हत्या झाल्या व चार लाख महिलांवर अतिप्रसंग करण्यात आला.

तत्कालिन भारतीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी राजनैतिक मुत्सद्येगिरीचा परमोच्च बिंदू गाठत झंजावाती जागतिक दौरा केला. या काळात त्यांनी देशातील जगातील प्रमुख देशांना भेटी देऊन बांग्लादेश मधील सद्यस्थिती त्या देशांच्या शीर्षस्थ नेतृत्वांच्या निदर्शनास आणून दिली. बांग्लालादेशातील मधील या स्थितीमुळे हजारो नागरिक भारताच्या आश्रयाला येत आहेत. यामुळे भारतीय संसाधनांवर अतिरिक्त ताण पडत आहे . पाकिस्तानच्या या कृत्याचा बंदोबस्त करणे गरजेचे बनले आहे. ही परिस्थिती अशीच सुरू राहिल्यास भविष्यात युद्धात उतरण्याशिवाय इतर कोणताही पर्याय भारतापुढे नसेल. मात्र भारत स्वतःहून युद्धास तोंड फोडणार नाही अशी भूमिका त्यांनी जागतिक नेतृत्वांच्या समोर मांडली. याच वेळी भारताने रशिया सोबत द्विपक्षीय सामरिक सहकार्याचा करार केला. या कराराचा अर्थ असा की भविष्यात दोन्हीपैकी कोणत्याही एका देशावर संरक्षण विषयक संकट आल्यास दुसरा देश त्या देशास सर्वोतोपरी लष्करी सहाय्य करेल.या करारामुळे रशियासारखा बलाढ्य

देश भारताच्या पाठीशी उभा राहिला. 3 डिसेंबर 1971 रोजी पाकिस्तानने भारताच्या श्रीनगर, पठाणकोट यासारख्या संरक्षण तळावर हवाई हल्ला केला. या हल्ल्यामध्ये भारताचे कोणतेही नुकसान झाले नसले तरी या हल्ल्यामुळे भारत - पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले. दरम्यानच्या काळात भारताने बांग्लादेश मधील नागरिकांना लष्करी प्रशिक्षण देऊन मुक्तीवाहिनी ही लढाऊ सेना उभारली होती. मुक्तीवाहिनी व भारतीय सैन्याने पाकिस्तानी लष्कराचा ठिकठिकाणी पराभव केला. 16 डिसेंबर 1971 रोजी पाकिस्तानच्या 93000 सैनिकांनी शरणागती पत्करली. पाकिस्तानी जनरल अमीर अब्दुल्ला नियाजी यांनी भारतीय लेफ्टनंट जर्नल जगजित सिंह अरोरा यांच्यासमोर शरणागतीपत्रावरती सह्या केल्या. ही 93000 सैनिकांची शरणागती आधुनिक जागतिक इतिहासातील सर्वात मोठे शरणागती मानली जाते.अशा पद्धतीने पश्चिम पाकिस्तान पासून स्वतंत्र होऊन बांग्लादेश हे नवे राष्ट्र निर्माण झाले आणि बांग्लादेश ला अधिकृत देश म्हणून मान्यता देणारा भारत हा पहिला देश ठरला.

**राजकीय वाटचाल :**

1971 साली बांग्लादेश स्वतंत्र झाल्यानंतर शेख मुजीब उर रहमान यांनी प्रथम राष्ट्राध्यक्ष व नंतर पंतप्रधान म्हणून राज्यकारभार चालवला. त्यांना बांग्लादेशमध्ये बंगबंधू किंवा बांग्लादेशचे पितामह म्हणून ओळखले जाऊ लागले. शेख मुजीब उर रहमान यांच्या कार्यकाळात भारत-बांग्लादेश संबंध अत्यंत सलोख्याचे होते. बांग्लादेशची राज्यघटना ही धर्मनिरपेक्ष राज्यघटना होती. शेख मुजीब उर रहमान यांनी बांग्लादेशला प्रगतीपथावर नेण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. परंतु पश्चिम पाकिस्तानचा नव्याने तयार झालेला हा बांगलादेश बांग्लादेश अनेकांना रुचत नव्हता. बांग्लादेश निर्मितीत लष्कराची बाजू सांभाळणाऱ्या झिया उर रहमान यांच्या नाराजीला पूर्व पाकिस्तान म्हणजे सध्याच्या पाकिस्तान मधील राजकीय शक्तींनी खतपाणी घातले. 15 ऑगस्ट 1975 रोजी बांग्लादेशी लष्कराने शेख मुजीबुर रहमान यांच्या राहत्या घरात घुसून त्यांची हत्या केली. त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबातील 17 सदस्यही यावेळी मृत्युमुखी पडले. यावेळी शेख मुजीब उर रहमान यांच्या दोन मुली शेख हसीना व शेख रिहाना या कामानिमित्त जर्मनीला होत्या. त्यामुळे त्या दोघी हल्ल्यातून बचावल्या. तेव्हा भारतीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांना तात्काळ संरक्षण पुरवून जर्मनीतून भारतात आणले. पुढे 1981 पर्यंत त्या नवी दिल्ली येथे शरणागत म्हणून भारतात आश्रयास होत्या.

1975 ते 1990 पर्यंत सत्तेवरती लष्कराचे वर्चस्व होते. झिया उर रहमान राष्ट्रपती झाले. त्यांच्याच कार्यकाळात 1977 मध्ये बांग्लादेशी राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष हा शब्द काढून इस्लामिक राज्यघटनेचा स्वीकार करण्यात आला 1981 साली झिया उर रहमान यांची हत्या करण्यात आली. 1981 मध्येच शेख हसीना पुन्हा बांग्लादेशमध्ये गेल्या बांग्लादेश आवामी लीग या पक्षाची सूत्रे हाती घेतली. त्यांचा हा पक्ष पुढील काही वर्षे बांग्लादेश मधील प्रमुख विरोधी पक्ष म्हणून कार्यरत राहिला जिया उर् रहमान यांच्या पत्नी बेगम खालिदा झिया यांचा बांग्लादेश नॅश्नलिस्ट पार्टी हा पक्ष सत्ता स्थानी होता. बी एन पी हा पक्ष अनेक कट्टर पंथ यांचे आश्रयस्थान असल्याचा आरोप जगभरातून होत राहिला.त्याच काळात बांग्लादेशात अमली पदार्थ नकली नोटा व हत्यारांच्या तस्करीचे जाळे विणले गेले.

शेख हसीना 2008 साली बांग्लादेशच्या पंतप्रधान झाल्या. तेव्हापासून 2024 पर्यंत त्यांनी बांग्लादेशच्या पंतप्रधान म्हणून कार्यकाल पाहिला.या काळात पुन्हा भारत व बांग्लादेश यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाले. सीमावर्ती भागातील काही वादग्रस्त प्रदेश सामंजस्याने चर्चा करून एकमेकांच्या स्वाधीन करण्यात आले. त्यासाठी भारतीय राज्यघटनेत 100 वी घटनादुरुस्ती केली गेली. शेख हसीना भारतीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळयाची उपस्थित राहिल्या. भारत व बांग्लादेश यांच्यामधील व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढीस लागला. शेख हसीना पंतप्रधान असताना भारताचा बांगलादेश मधील वाढता प्रभावाने चीनला बांगलादेशमध्ये हस्तक्षेप करण्यापासून दूर ठेवले. २०२४ मध्ये बांग्लादेशात निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये पुन्हा शेख हसीना यांच्या पक्षाला बहुमत मिळाले. या निवडणुकांमध्ये लष्कराने त्यांच्यावर गैरव्यवहार केल्याचा आरोप केला. आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगलादेशी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडले हे आंदोलन नियंत्रणात आणण्याच्या प्रयत्नात पोलिसांच्या गोळीबारात मीर मगदो याचा मृत्यू झाला. तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात मारहाण झाली. त्यामुळे आंदोलन आणखी तीव्र बनले. आंदोलनकर्त्यांनी शेख हसीना यांच्या घराकडे कूच केली. 11 जून 2024 रोजी शेख हसीना यांनी आपले सेनापती वकार उर जमा इंटेलेक्चुअल प्रमुख वकाल हसन आणि नॅशनल सिक्युरिटी एजन्सी यांचे प्रमुख तारीक हसन सिद्दिकी यांच्यासोबत तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत सर्व उच्चपदस्थांनी शेख हसीना यांना देश सोडून जाण्याचा सल्ला दिला. त्यानुसार शेख हसीना यांनी हवाई मार्गे देश सोडला. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी शेख हसीना यांच्या निवासस्थानावर हल्ला करून मोठ्या प्रमाणात मोडतोड केली. त्यानंतर लष्कराने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या मोहम्मद शहाबुद्दीन हे बांग्लादेशचे राष्ट्राध्यक्ष म्हणून तर अर्थतज्ञ मोहम्मद

युनूस हे प्रमुख सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.बांगलादेश मधील ही राजकीय परिस्थिती भारत-बांगलादेश संबंधांमध्ये एक मोठे आव्हान उपस्थित करू शकते.

**निष्कर्ष :**

१. शेख मुजीबुर रहमान राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान असताना भारत-बांग्लादेश संबंध परिदृढ झाले होते.
२. बांग्लादेश मधील राजकीय स्थित्यंतराच्या काळात उभय देशांनी आर्थिक व्यापार पूर्ववत सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते.
३. बांग्लादेश मधील राजकीय स्थैर्यासाठी भारताने वेळोवेळी पाठिंबा दर्शवला आहे.
४. शेख हसीना पंतप्रधानपदी असताना उभय देशात विविध विषयांवर सामंजस्य करार झाले आहेत.
५. 2024 मध्ये बदललेली बांग्लादेश मधील राजकीय परिस्थिती भारतासाठी आव्हानात्मक ठरू शकते.

**संदर्भ सूची :**

१. देवळाणकर शैलेंद्र, 'भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतरे ' प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2007
२. सतीश कुमार 'भारत-बांगलादेश संबंध उभरते आयाम' अनु बुक्स, 2017
३. डॉ. प्रतिमा, 'भारत-बांगलादेश संबंध बदलते परिप्रेक्ष उभरते आयाम' अनिकेत पब्लिकेशन्स, 2018
४. बसू रूमकी, 'आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना सिद्धांत आणि समस्या' सेज पब्लिकेशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, 2016
५. Dutta Piyali ' India Bangladesh Relations Issues Problems and Recent development' September 2010
६. Annual Report of Ministry of External Affair 2018-19
७. Mohammed Aminul Karim 'Bangladesh India Relations: Some Recent Trades Institute of South Asian Studies November 2009
८. India Bangladesh Bilateral Relations Ministry of External Affairs March 2021
९. Puri Niraml 'Indian Asian Relation' Jamia Milia Islamia University,1995
१०. Singh Nisha ' India Bangladesh Relations in the Post Cold War Period' Dayalbagh Educational Institute,2017
११. Ghosal Debjani 'Indo Bangladesh Relations Issues of Confrontation and contest 1997-2007', Jadavpur University,2012
१२. https://bdhcdelhi.org/president.html
१३. Bilateral brief India- Bangladesh February 2024